महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३७ वे | दिनांक : २९/०१/२०२६ | वार : गुरूवार

# अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू



**पुणे :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार (६६) यांचे निधन झाले आहे. बुधवारी सकाळी बारामती येथे त्यांचे विमान कोसळले. बारामती विमानतळावर लँडिंग दरम्यान हा अपघात झाल्याचे वृत्त आहे. विमानात त्यांच्यासोबत असलेले त्यांचे वैयक्तिक सहाय्यक, सुरक्षा कर्मचारी आणि विमान कर्मचाऱ्यांचाही मृत्यू झाला.

अजित पवार पंचायत निवडणुकीसाठी जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी बारामतीला जात होते. महाराष्ट्र हवाई वाहतूक विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विमान लँडिंगसाठी बारामती विमानतळाजवळ येत होते. सुरुवातीला पायलटला धावपट्टी स्पष्ट दिसत नव्हती, म्हणून त्याने विमान जास्त उंचीवर नेले. रिपोर्टनुसार, त्यावेळी दृश्यमानता सुमारे २ हजार मीटर होती. विमान लँडिंगचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर, बारामतीच्या धावपट्टी ११ वर उतरण्याचा दुसरा प्रयत्न करण्यात आला. या दरम्यान, विमान धावपट्टीवरून घसरले आणि क्रॅश झाले. त्यानंतर लगेचच त्यात आग लागली. लँडिंग दरम्यान पायलटने कोणतेही आपत्कालीन सिग्नल दिले नाहीत असेही वृत्त आहे. त्याने "मेडे" कॉल देखील केला नाही. घटनेच्या वेळी बारामती फ्लाइंग क्लबमध्ये कोणतेही विमान उडत नव्हते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बारामतीत पोहोचत आहेत. त्यांनी आज शाळेला सुट्टी आणि तीन दिवसांचा राजकीय दुखवटा जाहीर केला आहे. अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी सकाळी ११ वाजता बारामतीत अंत्यसंस्कार होणार आहेत. अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा पवार, काका शरद पवार, अजित पवारांचे दोन्ही मुले आणि बहीण सुप्रिया सुळे बारामतीत दाखल झाले आहेत. दरम्यान, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे उद्या अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारासाठी बारामतीत येणार आहेत.

दरम्यान, विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) ने अपघाताची चौकशी सुरू केली आहे. तपास यंत्रणेचे एक पथक दिल्लीतील विमान संचालक व्हीएसआर व्हेंचर्सच्या कार्यालयात पोहोचले आहे. दुसरे पथक बारामतीला रवाना झाले आहे.

दरम्यान, व्हीएसआर व्हेंचर्सने म्हटले की, पायलटला १६,००० तास विमान उड्डाणाचा अनुभव होता, तर सह-वैमानिकाला १,५०० तासांचा अनुभव होता. विमानात कोणतीही तांत्रिक बिघाड नव्हता, असा दावा कंपनीने केला आहे.

## महाराष्ट्राचे कधीही न भरून निघणारे नुकसान - शरद पवारांची प्रतिक्रिया



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील दुःखद निधनावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अत्यंत भावूक अंतःकरणाने आपली पहिली प्रतिक्रिया दिली असून, महाराष्ट्राचे कधीही न भरून निघणारे हे मोठे नुकसान आहे, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. हा निव्वळ एक अपघात असून यामध्ये कोणतेही राजकारण नसल्याचे स्पष्ट करतानाच, शरद पवार यांना शोक अनावर झाल्याने बोलणेही कठीण झाले होते. खरे तर आज मी प्रसारमाध्यमांसमोर येणार नव्हतो, असे नमूद करत त्यांनी आपल्या पुतण्याला गमावल्याचे दुःख अत्यंत जड अंतःकरणाने व्यक्त केले.

## अजित पवारांविरोधात मी जिवापाड लढले, जन्मभर लढले असते - अंजली दमानियांची भावनिक प्रतिक्रिया



डोकं खूप खूप सुन्न झाला ऐकून ! विश्वासच बसत नाही. अजित पवारांविरोधात मी जिवापाड लढले आणि ते जन्मभर लढले असते. पण हे खूप खूप चुकीचे घडले. पण हे... हे इतकं धक्कादायक आहे की स्वीकारणंच शक्य होत नाही. खूप धक्का बसला आहे...... खूप

## आम्हा सर्वांना काळाने पोरक केलं रुपाली चाकणकरांची भावनिक पोस्ट



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या आकस्मिक निधनाचे वृत्त समजताच सामान्य कार्यकर्त्यांपासून ते मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांपर्यंत सर्वांनाच मोठा धक्का बसला असून, संपूर्ण राजकीय वर्तुळातून तीव्र शोक व्यक्त केला जात आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक दिग्गज नेते आणि नागरिकांनी आपल्या लाडक्या दादांच्या आठवणींना उजाळा दिला आहे, तर अनेकांनी त्यांच्याशी झालेल्या शेवटच्या संवादाचे हृदयद्रावक अनुभव कथन केले. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी ट्विट करत आपल्या भावनांना वाट मोकळी केली आहे.

आमच्या राष्ट्रवादी परिवारावर आज दुःखाचा डोंगर कोसळला, दादा नावाच्या व्यक्तीच्या सावलीत असणाऱ्या आम्हा सर्वांना काळाने पोरक केलं. आमच्या डोक्यावरील आधाराची आणि मायेची सावलीच हिरावून घेतली, अशा शब्दांत रुपाली चाकणकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

रूपाली चाकणकर पुढे म्हणाल्या, सूर्याच्या साक्षीने दादांचे काम सुरू व्हायचे काम घेऊन येणाऱ्या प्रत्येक माणसाला दादा आपले काम करतील हा विश्वास वाटायचा हीच दादांची ओळख होती. दादा स्पष्टपणे जितके बोलायचे त्याच्या कैक पटीने जास्त त्यांच्या मनात प्रत्येकाबद्दल आदर आणि आपुलकी असायची.

## 'रयत शिक्षण'चा आधारस्तंभ हरपला! कर्मचाऱ्यांना अश्रू अनावर

**सातारा :** राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर रयत शिक्षण संस्था परिवारावर शोककळा पसरली. विमान अपघातात अजितदादाचे निधन झाल्याचे समजताच रयत शिक्षण संस्थेने अजितदादांना श्रद्धांजली वाहिली. तसेच संस्थेचे कामकाज स्थगित करून सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी दिली.

अजितदादांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याचे वृत्त समजल्यानंतर रयत शिक्षण संस्थेच्या विश्वस्त मंडळाला मोठा धक्का बसला. शाळा, महाविद्यालयांतील शिक्षक, कर्मचाऱ्यांना रडू कोसळले. सुरूवातीला त्यांचा या घटनेवर विश्वास बसला नाही. मात्र, वृत्तवाहिन्या आणि सोशल मीडियावरील बातम्यांनी सर्वांनाच शोकासागरात ढकलले. अजितदादांच्या निधनाचे कटू सत्य त्यांना पचवावे लागले.

अजितदादांच्या निधनाचे वृत्त समजताच साताऱ्यातील रयत शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यालयावर शोककळा पसरली. अजितदादा हे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य होते. त्यामुळे तातडीने श्रद्धांजली अर्पण करून दुखवटा पाळत कामकाज स्थगित करण्यात आले. शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली. संस्थेच्या प्रत्येक बैठकीला अजितदादा हजर असायचे. संस्थेचा अहवाल ते बारकाईने वाचायचे. सामान्य कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी नवनवीन संकल्पना अंमलात आणण्यासाठी ते आग्रही असायचे.

अजितदादांचे विमान अपघातामध्ये झालेले निधन ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. ही घटना रयत शिक्षण संस्थेच्या दृष्टीने, त्याचबरोबर महाराष्ट्राच्या दृष्टीने धक्कादायक आहे. सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, सर्वोत्तम दर्जाचे शिक्षण उपलब्ध व्हावे, महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास व्हावा आणि संपूर्ण देशात महाराष्ट्राची एक स्वतंत्र ओळख चिरंतन राहावी, यासाठी अजितदादांनी दिलेले योगदान चिरंतर लक्षात राहणारे आहे. त्यांच्या दुःखद निधनाने संस्थेसह महाराष्ट्राची कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे, अशा शब्दांत रयत शिक्षण संस्थेने अजितदादांना श्रद्धांजली वाहिली आहे.

साताऱ्यात रयत शिक्षण संस्थेची २०२५-२६ सालाची पहिली बैठक १३ एप्रिल २०२५ रोजी शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. त्यावेळी अजित पवार देखील उपस्थित होते. पक्ष वेगळे झाल्यामुळे काका-पुतण्याच्या संबंधात दुरावा आला होता. मात्र, दोघेही बैठकीत आजूबाजूच्या खुर्चीवर बसले होते. ग्रामीण भागातील मुलांना एआय तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय त्यावेळी घेण्यात आला होता. विशेष म्हणजे अहवालातील आकडे बोट ठेऊन शरद पवारांनी अजितदादांना दाखवले होते. राजकीय आणि कौटुंबिक कटुतेनंतर तब्बल चार तास इतका प्रदीर्घ काळ काका-पुतणे त्या दिवशी एकत्र होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २९ जानेवारी २०२६


# प्रजासत्ताक दिन : संविधान, लोकशाही आणि भारताच्या आत्म्याचा उत्सव

**भा**रताचा प्रजासत्ताक दिन म्हणजे केवळ एका तारखेचा उत्सव नाही, तर तो भारताच्या आत्म्याचा, मूल्यांचा आणि लोकशाही विचारधारेचा गौरवदिन आहे. २६ जानेवारी १९५० हा दिवस भारतीय इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिला गेलेला दिवस आहे. कारण याच दिवशी भारताचे संविधान अंमलात आले आणि भारत एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून नव्हे, तर एक संपूर्ण सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहिला. या घटनेने भारताच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाला नवी दिशा दिली.भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले, मात्र त्या स्वातंत्र्याला स्थैर्य, व्यवस्था आणि न्याय्य चौकट देण्याचे महान कार्य संविधानाने केले. अन्यथा स्वातंत्र्य म्हणजे केवळ सत्तांतर ठरले असते. संविधानामुळेच स्वातंत्र्याला लोकशाही अर्थ प्राप्त झाला. संविधान सभेने सुमारे तीन वर्षे अथक परिश्रम करून, विविध देशांच्या घटनांचा अभ्यास करून, भारतीय समाजाच्या गरजांनुसार हे संविधान घडवले. या ऐतिहासिक कार्याचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांची दूरदृष्टी, समता-दृष्टी आणि सामाजिक न्यायाची तत्त्वे भारतीय संविधानाच्या प्रत्येक शब्दातून प्रतिबिंबित होतात.भारतीय संविधान हे केवळ कायद्यांचे संकलन नाही, तर ते एक नैतिक दस्तऐवज आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता ही मूल्ये केवळ तत्त्वज्ञान नाहीत, तर भारतीय लोकशाहीची आत्मा आहेत. प्रत्येक नागरिकाला धर्मस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि समानतेचा अधिकार देऊन संविधानाने भारतातील विविधतेला एकतेच्या सूत्रात बांधले आहे. जगात क्वचितच असा देश आढळतो, जिथे इतकी विविधता असूनही लोकशाही टिकून आहे.प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी नवी दिल्ली येथे होणारी भव्य परेड ही केवळ प्रदर्शन नसून भारताच्या राष्ट्रीय शक्तीचे दर्शन आहे. सैन्यदलांची शिस्त, आधुनिक शस्त्रसज्जता, संरक्षण क्षमता आणि सांस्कृतिक झांक्यांमधून भारताची ओळख जगासमोर मांडली जाते. विविध राज्यांच्या झांक्यांमधून भारताची सांस्कृतिक समृद्धी, परंपरा, लोककला आणि सामाजिक वारसा प्रकट होतो. ही परेड म्हणजे भारताच्या “अनेकतेतील एकता” या संकल्पनेचे जिवंत रूप आहे.शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, शासकीय कार्यालये आणि सामाजिक संस्था येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. ध्वजारोहण, देशभक्तीपर गीते, भाषणे, नाट्य, कविता, लेझीम, पोवाडे, समूहगीत यांमधून राष्ट्रप्रेम व्यक्त केले जाते. लहान मुलांच्या मनात देशभक्तीची बीजे रोवली जातात, तर तरुणांच्या मनात कर्तव्यभावना जागृत केली जाते.मात्र प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून चिंतनाचा दिवस आहे. आजही समाजात असमानता, अज्ञान, अंधश्रद्धा, स्त्रीभेद, जातीभेद, भ्रष्टाचार, गरिबी, बेरोजगारी यांसारख्या समस्या आहेत. या समस्यांवर उपाय शोधण्याची दिशा संविधानच दाखवते. संविधान हे पुस्तकात बंद करून ठेवण्याचे नाही, तर जीवनात उतरवण्याचे आहे. संविधानातील मूल्ये जर आचरणात आली, तर समाज परिवर्तन अटळ आहे.लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते. लोकशाही म्हणजे सजग नागरिकत्व. प्रश्न विचारण्याची हिंमत, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य, सत्यासाठी लढण्याची वृत्ती आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याची मानसिकता म्हणजेच खरी लोकशाही. प्रजासत्ताक दिन आपल्याला हेच शिकवतो की लोकशाही ही केवळ शासनपद्धती नाही, तर ती एक जीवनशैली आहे.आजची युवा पिढी ही भारताची खरी शक्ती आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, नवोन्मेष, संशोधन, सामाजिक कार्य आणि राष्ट्रसेवा या माध्यमातून देशाच्या प्रगतीत युवकांचा मोठा वाटा आहे. संविधानाने दिलेल्या मूल्यांवर विश्वास ठेवून, स्वार्थापेक्षा समाजहिताला महत्त्व देणारी पिढीच भारताचे भविष्य घडवू शकते.आजचा भारत डिजिटल युगात प्रवेश करत असताना, विकासाच्या वाटेवर वेगाने पुढे जात आहे. मात्र विकास फक्त आर्थिक नसतो, तो मानवी मूल्यांचा, विचारांचा आणि नैतिकतेचाही असतो. संविधानाची मूल्ये जोपर्यंत आपल्या आचरणात उतरलेली नाहीत, तोपर्यंत खरा विकास अपूर्णच राहील.शेवटी, प्रजासत्ताक दिन आपल्याला एकच संदेश देतो- “संविधान जपले तरच स्वातंत्र्य टिकेल,लोकशाही जपली तरच भारत टिकेल,आणि मूल्ये जपली तरच मानवता टिकेल.” चला तर मग, या प्रजासत्ताक दिनी आपण सर्वजण एक संकल्प करूया की,आपण केवळ भारतीय नागरिक नसून जबाबदार भारतीय नागरिक बनू, संविधानाचा सन्मान करू, लोकशाही मूल्यांची जपणूक करू, आणि आपल्या भारतमातेला अधिक सक्षम, समृद्ध, न्याय्य व महान बनवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करू. जय हिंद! वंदे मातरम्! भारत माता की जय!

**कु. रजनी कैलास गारघाटे**
मो.नं:-९०७५१९६३९३
वणी

## चिंचबाई चिंचबाई

चिंचबाई चिंचबाई
वाकडी तुझी मान
आंबट गोड चव
लागते किती छान

साल तुझी काढता
रोड दिसतेस किती
जास्त खाल्यावर वाटते
खोकला येण्याची भीती

मीठ व गुळासोबत
तुझी अतूट दोस्ती
पाणीपुरी खाण्यासाठी
करतो आम्ही मस्ती

भांडी घासायला
तू अति गुणकारी
तांब्याची भांडी
चकाकतात भारी

कधी असते खिशात
कधी दप्तरात बसते लपून
मधल्या सुट्टीत आम्ही
खातो तुला चोखून



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103


# बनशेंद्रा येथे वाचक जागृती अभियान अंतर्गत चला वाचू आनंदे उपक्रमाचे आयोजन



**कन्नड (प्रतिनिधी) :** कन्नड तालुक्यात वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी तिफण वाचक चळवळ अंतर्गत कु.पुजा प्रमोद चव्हाण ही घेत असलेल्या शिवशक्ती ट्युशन क्लासेस बनशेंद्रा येथे नियमित तासभराचा 'चला वाचू आनंदे हा 'वाचन उपक्रम राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांची आकलनशक्ती व वाचनशैली विकसित व्हावी या उद्देशाने दररोज एक तासाचा वाचन उपक्रम सुरू करण्यात आला आहे. तिफण वाचक चळवळीचे संस्थापक , कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना कथा, कविता, आत्मचरित्रे, सामान्य ज्ञान, बोधपर पुस्तके तसेच साहित्य वाचण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे. वाचनानंतर विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्याची संधी दिली जाणार असून त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास व भाषिक कौशल्य वाढण्यास मदत होईल.आजच्या मोबाईल आणि डिजिटल युगात पुस्तकांपासून दूर जात असलेल्या विद्यार्थ्यांना वाचनाकडे वळवणे, ही या उपक्रमामागील मुख्य भूमिका आहे. या उपक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन समन्वयक कु. पुजा प्रमोद चव्हाण यांनी केले आहे.


शोक संदेश



अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राने एक स्पष्टवक्ता, शिस्तबद्ध आणि कार्यतत्पर नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे.या दुःखद प्रसंगी अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो..!!

**बसवराज माधवराव पाटील**
जिल्हाध्यक्ष,
भारतीय जनता पार्टी,
लातूर ग्रामीण

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २९ जानेवारी २०२६


## तिफण वाचक चळवळ तर्फे धनगरवस्ती शाळेस पुस्तके भेट




**कन्नड (प्रतिनिधी) :** त्रैमासिक तिफण व तिफण वाचक चळवळ यांच्या वतीने ग्रामीण भागात वाचन संस्कृती वाढावी, विद्यार्थ्यावर वाचनाचे संस्कार होऊन उत्तमोत्तम पुस्तकांचे वाचन त्यांनी करावे या महत्वपूर्ण उद्देशाने पुस्तके भेट देण्यात येतात, या उपक्रमातंर्गत जिल्हा परिषद प्रशाला धनगरवस्ती ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर या शाळेस ५० पुस्तके भेट देण्यात आली. शाळेत तिळगुळ व स्नेहमिलन तसेच लेखक आपल्या भेटीला या कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. (ता. २३ ) या कार्यक्रमास प्रमुख अतिथी व वक्ते म्हणून सुप्रसिद्ध कवी , व्याख्याते तथा तिफण चे संपादक प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षक व पालकांची भूमिका तसेच लेखन वाचन कौशल्ये या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. प्रा. डॉ. हुसे म्हणाले की, आजच्या काळात विद्यार्थी मोबाईलच्या विळख्यात अडकले आहे. वाचनाकडे दुर्लक्ष होत आहे. त्यांना मोबाईल पासून दूर ठेवायचे असेल तर पुस्तक वाचनाची गोडी लावणे आवश्यक आहे. त्यासाठी गावोगावी व शाळेत वाचन कट्टा सुरू करावे लागेल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी पुरक उपक्रम सुरू करावे लागतील, त्यातूनच संस्कारक्षम पिढी घडेल असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी ग्रामस्थ, शालेय समिती पदाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका वृषाली सोनवणे, सुनिता सावळे, झोटिंग , भीमराव सोनवणे आदींची उपस्थिती होती.


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर, अंबाजोगाई येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा




**अंबाजोगाई :** येथील स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर या शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिन इयत्ता शिशुविहार ते दुसरीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने अत्यंत आनंदी व राष्ट्रभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष आदरणीय श्री संतोष दादा कुलकर्णी उपस्थित होतेकार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री भगवंत पाळवदे सर (वंदे मातरम आयटीआय कॉलेज, एकल महिला व अनाथ बालक पुनर्वसन प्रकल्प) लाभले. तसेच प्रभाग क्रमांक सहाचे नूतन नगरसेवक माननीय श्री आकाश कराड सर व नूतन नगरसेविका सौ. सुचिता अतुल देशपांडे ताई हे प्रमुख अतिथी म्हणून कार्यक्रमास उपस्थित होतेकार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. दिपालीताई माळी यांनी केले. यानंतर इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले सह्याद्रीचे कडे गरजले ...” हे समूहगीत वातावरणात देशभक्तीची लाट निर्माण करणारे ठरलेविद्यार्थ्यांनी कवायत, चिमणी गट, मयूर गटाचे समूहगीत, इयत्ता पहिलीच्या वर्गाचा सूर्यनमस्कार, ऑपरेशन सिंदूर हा प्रभावी ऍक्ट, “हा देश माझा” या गीतावर आधारित मुकाभिनय, इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांचे मनोरे, नारीशक्ती नृत्य, तसेच “हम होंगे कामयाब” हे समूहगीत इंग्रजी मधून "We shall overcome " सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या या वैविध्यपूर्ण व दर्जेदार सादरीकरणाला उपस्थित पालकवर्ग व प्रमुख पाहुणे तसेच शिक्षकवर्गा कडून भरभरून दाद मिळालीकार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सौ. सुचिता देशपांडे ताई यांनी आपल्या मनोगतात विवेकानंद शाळेमध्ये आदर्श विद्यार्थी घडवले जातात,” असे गौरवोद्गार काढले. श्री भगवंत पाळवदे सर यांनी आई-वडिलांना महत्त्व देणे व गुरूचा आदर करणे यावर भर देत, विवेकानंद शाळेमध्ये हे संस्कार रुजविण्यासाठी आदरणीय संतोष दादा कुलकर्णी नेहमीच प्रयत्नशील असतात, असे नमूद केले प्रभाग क्रमांक 6 चे नूतन नगरसेवक श्री आकाश कराड सर यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या अध्यक्षीय समारोप करताना माननीय श्री संतोष दादा कुलकर्णी यांनी पालकांशी संवाद साधताना मोलाचे विचार मांडले. मुलांना अपयशाला सामोरे जाऊ द्या, पहिल्याच प्रयत्नात झालेली चूक म्हणजे अपयश नाही; विद्यार्थी चुकला नाही तर तो शिकणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच पालकांनी मुलांच्या सकस आहाराकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे, यावरही त्यांनी भर दिला या कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन सौ. अंकिता कुलकर्णी ताई यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनुजा कुलकर्णी यांनी केले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे प्रजासत्ताक दिनाचा हा सोहळा अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला

## परीक्षेच्या भीतीला हरवून यशाचे शिखर गाठूया; ज्ञानेश्वर विद्यालयात मार्गदर्शन शिबिर संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** विवेकानंद शिक्षण संस्था संचालित, ज्ञानेश्वर विद्यालय (बेगमपुरा) येथे इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'परीक्षेला सामोरे जाताना...' या विषयावर विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाच्या कै. पंढरीनाथ पाटील शिसोदे उर्फ भाऊ सभागृहात पार पडलेल्या या शिबिरात तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना परीक्षेचा ताण-तणाव नियोजन आणि अभ्यासाच्या प्रभावी पद्धतींबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे, प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. संदीप शिसोदे, विश्वा अकॅडमीचे संचालक श्री. विश्वा बाहेती, पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे आणि ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.तज्ज्ञांचे मार्गदर्शन:मुख्य मार्गदर्शक डॉ. संदीप शिसोदे यांनी 'परीक्षेची भीती आणि मानसिक आरोग्य' यावर बोलताना विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने संकटांना सामोरे जाण्याचा मंत्र दिला. तर, श्री. विश्वा बाहेती यांनी अभ्यासाचे स्मार्ट नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि परीक्षेतील यशाचे तंत्र यावर सविस्तर प्रकाश टाकला.अध्यक्षीय समारोप:कार्यक्रमाचा समारोप करताना मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. "शाळेने आयोजित केलेले हे शिबिर तुमच्यातील न्यूनगंड दूर करण्यासाठी असून, विद्यार्थ्यांनी धैर्याने परीक्षेला सामोरे जावे," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.सहभाग आणि नियोजन:कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. भरत झोडपे यांनी केले, तर सूत्रसंचालन श्रीमती मंगल सुलताने यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. रवींद्र साठे यांनी आभार मानले. या शिबिरात नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २९ जानेवारी २०२६

# तिफण कविता महोत्सवाने दिले मला व्यासपीठ



कन्नड येथे त्रैमासिक तिफण, सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालय कन्नड , भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या वतीने राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव नुकताच मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने पार पडला . कन्नड हे कवितेचं गाव म्हणून ओळखल जातं. या साहित्य नगरीत यंदा तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवाचे आठवे वर्ष मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडले. माझे तिफण कविता महोत्सवाला उपस्थित राहण्याचं हे तिसरं वर्ष आहे . यामध्ये मला अनेक नव- नवीन अनुभव येत गेले, नवनवीन माहिती शिकत गेले, कवीची निरीक्षण शक्ती कशी असावी? रसिक कसा असावा? त्याचं चिंतन मनन कशाप्रकारे असावं? हे मी या तिफन कविता महोत्सवात शिकले. कन्नड नगरीत प्रवेश करताच सुरुवातीलाच राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव येथे "ग्रंथदिंडी " काढण्यात आली. त्यानंतर कवी नारायण सुमंत, प्रतिभा खैरनार हे मान्यवर कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहिले .नारायण सुमंत यांनी तर आपल्या अमृतवाणीने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. सर्व श्रोते अगदी मंत्रमुग्ध होऊन त्यांच्या कविता आणि मनोगत ऐकत होते . कविता कशी असावी? याच अनमोल मार्गदर्शन सुप्रसिद्ध कवी नारायण सुमंत यांनी केल . खरंतर हा कविता महोत्सव ज्यांच्यामुळे आम्ही अनुभवला ते म्हणजे सुप्रसिद्ध कवी ,लेखक तिफणकार डॉ. शिवाजी हुसे सर यांच्यामुळेच आम्ही अल्पावधीतच नावा रूपास आलो. नाहीतर आमची ओळख खूप मर्यादित होती. नाव नको, प्रसिद्धी नको असे असलेले आणि आपल्या नावास पुरेपूर शोभणारे असे डॉ.हुसे सर. त्यांची मेहनत, जिद्द आणि चिकाटी पाहून मन थक्क होते.

तसेच, शुभदा देवरे या मॅडमच्या विद्यार्थिनींनी अतिशय एकाहून एक सरस अशा कविता केल्याच्या नंतर व येथील परिसरातील ग्रामीण भागातील कवी सुद्धा लिहू लागले ही मोठी अभिमानास्पद बाब आहे .या दिवशी " नऊ" पुस्तकांचे प्रकाशन या तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवात करण्यात आले. तसेच छाया जायभाये यांना देखील कै .भिकाजीराव हुसे तिफण राज्य काव्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.असा हा कविता महोत्सव म्हणजे एक साहित्यिकांसाठी, नव कवींसाठी पर्वणीच म्हणावा लागेल. कन्नड येथे ११ जानेवारी रोजी असंख्य साहित्य प्रेमींच्या उपस्थितीत राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या कवी, साहित्यिक ,अभ्यासक ,व रसिक प्रेक्षकांच्या उपस्थितीमुळे हा महोत्सव साहित्यिक पर्वणी ठरला.या कविता महोत्सवाचे उद्धाटन राजेंद्र दिघे व मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सुप्रसिद्ध नामवंत कवी नारायण सुमंत, प्रतिभा खैरनार यांच्या हस्ते आणि इतर सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला तिफण कविता महोत्सवाची परंपरा तिचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. ज्यांनी ध्यास घेतला ; नवोदित कवींना आपलं स्वप्न साकार करण्याचं तसेच, त्यांना व्यासपीठ मिळवून देणारे कन्नड तालुक्याच लाडकं व्यक्तिमत्व असलेले प्राध्यापक डॉ. शिवाजी हुसे यांनी प्रास्ताविक केले. तिफण कविता ही ग्रामीण जीवन माणसातील संवेदना, संघर्ष आणि आशा यांचे प्रभावी चित्रण करणारे काव्यप्रकार असल्याचे त्यांनी नमूद केले. या कविता महोत्सवात राज्यभरातील अनेक नामवंत तसेच नवोदित कवींनी सहभाग घेतला. त्यांच्या कवितांमधून शेतकरी जीवन, स्त्री सक्षमीकरण, सामाजिक वास्तव ,प्रेम ,निसर्ग आणि मानवी नातेसंबंध यासारख्या विविध विषयांना स्पर्श करण्यात आला. प्रत्येक कवितेला रसिकांनी भरभरून दाद दिली. काही कवितांनी प्रेक्षकांना अंतर्मुख केले; तर काहींनी हास्य व टाळ्यांचा कडकडाट मिळवला. . या सत्रात कवींनी आपल्या लेखन प्रवासाविषयी, प्रेरणा स्थानांविषयी आणि तिफन कवितेच्या बदलत्या स्वरूपाविषयी मनोगत व्यक्त केले. नवोदित कवींना व्यासपीठ मिळाल्यामुळे त्यांच्या कलागुणांना वाव मिळाला.महोत्सवाच्या शेवटी उत्कृष्ट काव्य सादरीकरण करणाऱ्या कवींना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.कार्यक्रमाचे संयोजन अत्यंत शिस्तबद्ध व नेटके होते. या राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवामुळे कन्नड शहराची साहित्यिक ओळख अधिक बळकट झाली असून मराठी साहित्याच्या संवर्धनाला नवी दिशा मिळाली आहे. राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव यशस्वी करण्यामागे सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालय कन्नड,तिफणकार डॉ.शिवाजी हुसे सर आणि सर्व संयोजन समिती यांची अथक मेहनत, चिकाटी आणि साहित्यावरील निस्सिम प्रेम महत्त्वाचे ठरते. तिफण कविता महोत्सवाला स्वतंत्र ओळख व स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने लेखन, संशोधन, मार्गदर्शन आणि आयोजनाच्या माध्यमातून मोलाचे कार्य केले आहे. ते केवळ तिफणकार नसून ते एक संवेदनशील साहित्यिक, अभ्यासू संशोधक आणि नवोदित कवींना प्रोत्साहन देणारे मार्गदर्शक ही आहेत. साहित्य चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते आहेत. ग्रामीण जीवन समाजातील वास्तव , श्रमजीवी माणसांचे सुख - दुःख स्त्री जीवन आणि मानवी संवेदना हे त्यांच्या लेखनाचे प्रमुख विषय आहेत.त्यांच्या कवितांमध्ये शब्दांची प्रभावी परखड अशी मांडणी असली तरी त्यांचा शब्द न शब्द अंतर्मुख करणारा असतो. कन्नड येथे आयोजित राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवासाठी त्यांनी अथक परिश्रम करून नियोजन केले. कवींची निवड ,कार्यक्रमांची आखणी, रसिकांपर्यंत पोहोच तसेच साहित्यिक वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला.त्यांच्या परिश्रमामुळे हा महोत्सव केवळ कार्यक्रम न राहता तीफण कवितेचा उत्सव ठरला.मराठी साहित्याच्या संवर्धनासाठी आणि तीफण कवितेच्या प्रसारासाठी यांचे योगदान मोलाचे असून त्यांचे कार्य भावी पिढीतील कवींना निश्चितच प्रेरणादायी ठरणारे आहे. त्यांना तर मी "रत्नपारखीच" म्हणेल . ग्रामीण किंवा शहरी भागातील , मातीतील कवी ते अचूक हेरतात आणि त्यांना हिऱ्याप्रमाणे पैलू पाडतात . कुठला गवगवा नाही की कुठली जाहिरात नाही. म्हणूनच त्यांच्यासाठी म्हणावेसे वाटते- शब्दांच्या मळयात राबणारा किसान पुत्र शेतकरी , साहित्याचा हा वारकरी नेतो गगनी नवोदित कवींची स्वारीउगवतात येथील मातीतून शब्द फुले व कवी कवितेच्या पायवाटेवर दीप लावणारा प्रवासी, तिफणीच्या या काव्य मैफिलीत ओतले जीवन तो म्हणजे साहित्याचा खरा वारकरीपाडतात कोळशाला ही हिऱ्यासमान समान पैलू असा हा जोहरी अनेक आली संकटे उभी राहिली स्पीड ब्रेकर मात्र घाम गाळून उभं केलं काव्याचं व्यासपीठ नव्या कवीला दिलं स्वप्न पाहण्याचं बळ ग्रामीण माणसांचे दुःख झाल शब्द रूप त्यांच्या लेखणीतून उमटला समाजाचा विकास नाव नको, अन कुठलीही प्रसिद्धी नको फक्त कविता जगावी एवढीच आस तिफण कविता महोत्सवाला दिली नवी दिशा, साहित्याचा उभारला निस्वार्थ श्वास असे हे तिफणकार यांनी जागवली आमच्या जीवनात नवीन ज्योत खास.... याच तिफण कविता महोत्सवाने माझ्या सारख्या नवोदित दुर्लक्षित कवयित्रीला हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले. आज मी थोडेबहुत काव्यलेखन करीत आहे ही या तिफण परिवाराचीच देण आहे. मी या तिफण परिवाराशी लेखणीच्या बळावर जोडले गेले आणि कायमचे या परिवाराचे सदस्य झाले. हा तिफण कविता महोत्सव आता माझ्या जीवनाचा एक अविभाज्य भाग झाला आहे. त्यामुळेच दरवर्षी कविता महोत्सवाची आम्हास ओढ लागते. तिफण कविता महोत्सवाने हजारो कविंना व्यासपीठ दिले. आता मी ही या तिफण कविता महोत्सवाचीच एक भाग झाले आहे. हा कविता महोत्सव कन्नड च्या सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देत आहे. हा केवळ कवितेचा उत्सव नाही तर माणूस होण्याची कार्यशाळाच आहे. कवी आणि कवितेवर निखळ प्रेम करणारं कवितेचे गाव कन्नड शिवाय दुसरं नाही. असे हा कविता महोत्सव अनुभवल्यानंतर वाटल्याशिवाय रहात नाही.

**वृषाली सोनवणे**
**शिक्षिका तथा कवयित्री**

## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २९ जानेवारी २०२६


## मराठी माध्यम राज्याच्या संस्कृती व संस्कारांचे विद्यापीठ - पोलीस उपायुक्त प्रवीण मोरे



**कन्नड (अरुण थोरात) :** मराठी माध्यमाच्या शाळा या केवळ शिक्षणसंस्था नसून राज्याच्या संस्कृती, परंपरा आणि संस्कारांचे जतन करणारी केंद्रस्थाने आहेत, असे प्रतिपादन अँटी करप्शन ब्युरो, पुणे येथील डी.वाय.एस.पी. प्रवीण मोरे यांनी केले आहे. ते जिल्हा परिषद प्रशाला अंधानेर ता.कन्नड येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजीव जाधव होते. सूत्रसंचालन दीपक सोनवणे यांनी केले, तर प्रास्ताविक संजय केवट यांनी मांडले. यावेळी बोलताना श्री. मोरे पुढे म्हणाले की, सध्या मराठी माध्यमाच्या शाळांची झालेली परवड चिंताजनक आहे. या शाळा टिकल्या तरच सुसंस्कृत पिढी घडेल आणि उद्याचा सुजलाम सुफलाम महाराष्ट्र घडू शकेल. मी स्वतः याच शाळेत शिक्षण घेतले आणि अधिकारी झालो. आजच्या विद्यार्थ्यांना अधिक प्रगत साधने उपलब्ध आहेत. त्यामुळे पालकांनी मुलांच्या शिक्षणासाठी मातृभाषेला प्राधान्य द्यावे.मातृभाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या भावभावना, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होतो, असेही त्यांनी नमूद केले. यश–अपयश पचवण्याची ताकद, जीवनातील अडचणींना धैर्याने सामोरे जाण्याची वृत्ती आणि ठाम नेतृत्वगुण हे मातृभाषेतील शिक्षणातूनच विकसित होतात. जगातील अनेक देशांमध्ये मुलांना प्राथमिक शिक्षण मातृभाषेत दिले जाते आणि नंतर परकीय भाषा शिकवल्या जातात. मात्र आपल्या राज्यात उलट चित्र दिसत असून ही बाब भविष्यासाठी धोकादायक आहे, असेही ते म्हणाले.विद्यार्थ्यांमधील वाढती नैराश्याची भावना, व्यसनाधीनता, आत्महत्यांचे प्रमाण आणि अपयश सहन न होणे यामागे मातृभाषेतील शिक्षणाचा अभाव हे एक मोठे कारण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण भागात ही परिस्थिती अधिक गंभीर असल्याचे त्यांनी सांगितले.आज मराठी शाळा टिकल्या तरच मुलांचा, कुटुंबाचा आणि गावागावांचा विकास शक्य आहे. अन्यथा शिक्षण गरिबांसाठी दूर जाईल आणि समाजातील संस्कार हरवतील. मराठी शाळांमधून शिक्षण घेऊन इतर परकीय भाषा आत्मसात करणे हीच योग्य दिशा आहे, असे आवाहन त्यांनी पालकांना केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक,पालक, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी आभार प्रदर्शन संजय केवट यांनी केले.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय वाणिज्य विभागाचे विद्यार्थी गिरीश आपन्ना मुळे एमपीएससी ऊतीर्ण



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय कॉमर्स विभागातील विद्यार्थी गिरीश आपन्ना मुळे याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या राज्यसेवा परीक्षेत उत्तीर्ण होऊन सहाय्यक संचालक महाराष्ट्र वित्त व लेखा अधिकारी वर्ग 1 राजपत्रित पदी निवड झाली. याबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल शिवाजीराव मोरे, सहसचिव डॉ सुभाष वाघमोडे, संचालक सुनील माने, संचालक अशोक पाटील, संचालक दिगंबर राव बिराजदार, प्राचार्य डॉ संजय अस्वले यांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. वाणिज्य विभाग शिक्षण घेत असतानाच महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रात प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा परीक्षा अभ्यासाची तयारी तयारी केली. दरम्यान मुळे गिरीश याची 2022 मध्ये मंत्रालय क्लार्क व कर सहाय्यक म्हणून निवड 2023 मध्ये PSI पदी निवड पण जॉईन केली नाही 2023 मध्येच health assistant म्हणून निवड लातूर आणि राज्यसेवा 2024 जाहिरात मध्ये सहाय्यक संचालक महाराष्ट्र वित्त व लेखा अधिकारी वर्ग 1 राजपत्रित पदी निवड.एका सर्वसामान्य कुटुंबातील सर्वसामान्य विद्यार्थी एमपीएससी राज्यसेवा परीक्षाच उत्तीर्ण होण्याची जिद्द ठेवू शकतो. आणि ते पूर्ण करू शकतो. याचा आदर्श ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी घ्यावा. असे आव्हान भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल शिवाजीराव मोरे यांनी केले आहे.त्याच्या या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष आश्लेष मोरे, सरचिटणीस जनार्दन साठे, चिटणीस पद्माकर हराळकर, सर्व संचालक मंडळ उपप्राचार्य डॉक्टर विलास इंगळे डॉ पी ए पिटले प्रा जी एस मोरे प्रा शैलेश महामुनी, प्रबंधक राजकुमार सोनवणे, कार्यालयीन अधीक्षक नितीन कोराळे, कॉमर्स विभागाचे विभाग प्रमुख डॉ अजित आष्टे आणि प्राध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.






## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात 'चित्रपट रसास्वाद' कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात दिनांक 23 जानेवारी 2026 रोजी अभिरुची वाङ्मय मंडळातर्फे 'चित्रपटाचा रसास्वाद कसा घ्यावा?' तसेच चित्रपट क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई, अभिरुची वाङ्मय मंडळाच्या प्रमुख डॉ. प्रमेला मुखेडकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक प्रा. माधुरी भावसार तसेच अकराव्या अजिंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (AIFF) संयोजन समिती सदस्य प्रा. सीमा औटे, नीलिमा जोग व ज्योती शर्मा उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रमेला मुखेडकर यांनी केले. त्यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात चित्रपट रसास्वादाचे महत्त्व अधोरेखित केले.यानंतर प्रा. सीमा औटे यांनी अजिंठा-वेरूळ चित्रपट महोत्सवाची माहिती देत विविध भाषांतील चित्रपट पाहण्याची संधी, तसेच चित्रपटसृष्टीतील नामांकित दिग्दर्शक, निर्माता आणि कलाकारांना भेटण्याची व संवाद साधण्याची संधी महोत्सवातून मिळते असे सांगितले. चित्रपट क्षेत्रात तीनशेहून अधिक करिअर संधी उपलब्ध असून कलाशाखेतील विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे डोळसपणे पाहावे असे त्यांनी आवर्जून नमूद केले. पटकथा लेखन, संवाद लेखन, अनुवाद, तांत्रिक विभाग (टेक्निशियन) इ. अनेक संधी उपलब्ध असल्याचे सांगून, विद्यार्थी रील्स तयार करतातच; मात्र आपल्या छंदाचे रूपांतर शॉर्ट फिल्म निर्मितीत करून करिअर घडवू शकतात असे मार्गदर्शन केले.यावेळी नीलिमा जोग व ज्योती शर्मा यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई यांनी कार्यशाळेसाठी शुभेच्छा देत विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा असे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रमेला मुखेडकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन मराठी विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी देव यांनी केले. मोठ्या संख्येने प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २९ जानेवारी २०२६


## राजीव गांधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उदघाटन संपन्न



**करमाड :** राजीव गांधी महाविद्यालय, करमाड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित "शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट व्यवस्थापन आणि पडित जमिण विकासावर विशेष लक्ष" या विषयावरील राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्धाटन समारंभ दत्तक ग्राम मौजे भांबर्डा येथे मोठ्या थाटामाटात पार पडले. सर्वप्रथम महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात केली.या शिबिराच्या ऊद्धाटन प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करुन राष्ट्रीय सेवा योजनेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर एनएसएस च्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.सुरुवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.कालिदास फड यांनी केले. त्यांनी सात दिवशीय शिबीरातील उद्दिष्टे स्पष्ट करत शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन आणि पडित जमीन विकास या विषयांच्या अनुषंगाने शिबिरातील विविध उपक्रम व लोकसहभागाचे महत्व याविषयी सविस्तरपणे माहिती दिली. येणाऱ्या सात दिवसांच्या शिबिरामध्ये जलसंधारण, पडीक जमीन विकास, ग्रामस्वच्छता, वृक्ष लागवड , शाश्वता विकासावर प्रबोधनात्मक प्रवचन, मतदार जनजागृती व सामाजिक बांधिलकी जोपासणारे विविध उपक्रम राबविण्यात येणार असून या माध्यमातून युवकांमध्ये राष्ट्रनिर्माणाची जाणीव अधिक बळकट होईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यानंतर उद्धाटन पर मनोगत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक मा.डॉ.सोमिनाथ खाडे यांनी उपस्थित स्वंयसेवक आणि ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांनी समाजसेवा, श्रमप्रतिष्ठा आणि ग्रामविकासासाठी प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे, यावर सखोल विचार मांडले. तसेच शिबिरातील उपक्रमांमध्ये स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध सहभाग घेऊन समाजाला सकारात्मक दिशा द्यावी, मोबाईल स्क्रीन टाइम विरुद्ध ग्रीन टाइम म्हणजे मोबाईलचा स्क्रीन टाइम कमी करून तो 'ग्रीन टाइम'कडे (पर्यावरण व निसर्ग संवर्धन) कडे वळवण्याचे आवाहन केले आहे.राष्ट्रीय सेवा योजनेमुळे आपल्या विचाराची दिशा निश्चित होते. शिबिरातील संस्कार हे चिरकाल टिकणारे हवेत. अलीकडे मोबाईलमध्ये आपण आपला बहुतांश वेळ घालवतो. तोच वेळ विधायक कार्यासाठी उपयोगात आणावा. स्क्रीन टाईम ते ग्रीन टाईम अशा प्रकारचे छोटे छोटे उपक्रम राबवून उत्तम आदर्श निर्माण करावेत. हा ग्रीन टाइम तुम्हाला ऊर्जा देईल. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वतःला घडविले पाहिजे व त्यातून समाज सुधारेल. आपल्यातील संवेदनशीलता वाढली पाहिजे. आपणाला मिळालेला वेळ विनाकारण वाया घालू नका. तो अमूल्य आहे. असे प्रतिपादन डॉ. सोमिनाथ खाडे यांनी केले.रा.से.यो.च्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता वाढीसोबतच तरुणांमध्ये योग्य संस्कार होतात, विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीपुरते मर्यादित न राहता समाज आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी कार्य करावे, असे आवाहन केले. यानंतर ह.भ.प.चंद्रकलाताई फुकटे यांनी शिबिरार्थ्यांना शुभेच्छा देऊन शिबीर आयोजनाचे कौतुक करून ग्रामविकासासाठी असे विविधा उपक्रम सातत्याने राबविले जावेत,अशी अपेक्षा व्यक्त केली.

त्याचबरोबर तंटामुक्त ग्राम समितीचे सदस्य बळीराम पाटील काळे यांनी देखील सर्व शिबिरातील स्वयंसेवकांना शुभेच्छा दिल्या आणि आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.सदाशिव मुळे यांनी भूषविले आणि अध्यक्षीय समारोपात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची समाजपरिवर्तनाची चळवळ असल्याचे सांगून शिबिरातील प्रत्येक उपक्रमात स्वयंसेवकांनी प्रामाणिकपणे सहभाग घ्यावा असे मार्गदर्शन केले. यावेळी विशेष ऊपस्थिती ह.भ.प.रावसाहेब महाराज फुकटे आणि प्रमुख उपस्थिती मध्ये भांबर्डा गावचे सरपंच श्रीमती इंदुबाई पठाडे, उपसरपंच श्री.सजनराव शिंदे आणि इतर ग्रा.सदस्य आणि ग्रामसेवक व जिल्हा परिषदचे शिक्षक देखील ऊपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.किशोर काळे आणि आभार डॉ.नितीन मुळे यांनी मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्धाटन प्रसंगी प्रा.डॉ.बाळासाहेब लिहिणार, प्रा.डॉ.आश्विनकुमार चिंचोलीकर, प्रा. डॉ. जयश्री पाटील ऊपस्थित होते या उद्धाटन समारंभाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.ईम्राण पठाण,प्रा.प्रशांत माठे, प्रा.लक्षमन खरात, प्रा.हरिदास होळकर, डॉ.ललित गोल्डे, प्रा.डॉ.नानासाहेब लावंड, प्रा.डॉ.रमेश कचरे,प्रा.रामदास घोडके, प्रा.डॉ.अमित राऊत, डॉ.सौरभ चव्हान, डॉ. अतुल मोरे, श्री.मधु राठोड, श्रीमती पारेकर याबरोबरच सुदाम भाऊ ठाडे, भिमभाऊ पठाडे, पवन गोंडे, महेश दिवटे इ. गावातील मंडळीनी आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सर्वांचे सहकार्य लाभले. यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## अजित दादाच्या सहवासातील काही आठवणी...

**जालना :** "महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याची बातमी सकाळी कळली ,अत्यंत वेदना व दु:ख झाले, मी सकाळ मध्ये नाशिक जिल्ह्यात बोरगाव (सुरगाणा )येथून बातमीदार म्हणून काम करत होतो. महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर चोरटी कापसाची वाहतूक गुजरात मध्ये केली जात होती , याची बातमी मी सकाळ मधून प्रसिद्ध केली. त्याच महिन्यात अजित दादा नाशिकला आले होते. आम्ही सकाळच्या पत्रकारांनी त्यांची भेट घेतली ,ते म्हणाले कोण रे तो तुमचा पट्ट्या... ज्यान कापसाच्या चोरटी वाहतुकीची बातमी दिली, मी भीत भीत पुढे आलो, दादा म्हणाले घाबरू नका, फार चांगलं काम केलं महाराष्ट्र सरकारचे डोळे तुम्ही उघडले , शेतकऱ्याच्या कापसाला निश्चितच चांगला भाव महाराष्ट्रात दिला जाईल. त्यामुळे कापूस चोरून गुजरातला शेतकऱ्याला विकता येणार नाही , येत्या अधिवेशनात हा शेतकऱ्यांचा प्रश्न मी मांडतो ,तुम्ही चिंता करू नका. दादांनी मला शाबासकी दिली. कार्यकारी संपादक कांबळे साहेब यांनी माझं कौतुक केले. जीवनात पहिला आणि शेवटचा दादांना भेटण्याचा हा योग मला आला. त्यांचा करारी स्वभाव मला भावला.दादांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली, जनता दु:खात बुडाली, अभ्यासू, स्पष्टवक्ता, लोककल्याणकारी निर्णय घेणारे दादांना भावपूर्ण श्रद्धांजली.


**प्रा डॉ राजेंद्र सोनवणे**

जे ई एस महाविद्यालय जालना.


## बोर्ड परीक्षेचे टेन्शन 'डाऊन'; शेख शकील सरांकडून यशाचा 'पॉवर डोस'!



**जळगाव :** बोर्ड परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी, आज अलफैज हायस्कूलमध्ये 'एस.एस.सी इंग्रजीमध्ये प्राविण्य मिळवणे' या विषयावर एक विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली.या सत्राचे मार्गदर्शन जळगाव येथील इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य,शेख शकील यांनी केले.या कार्यशाळेत प्रामुख्याने एस.एस.सीच्या कृतीपत्रिकेतील बारकाव्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले, विशेषतः लेखन कौशल्य विभागावर,जो विद्यार्थ्यांना अनेकदा सर्वात मोठे आव्हान देतो.शेख शकील यांनी पत्रलेखन,अहवाल लेखन आणि कल्पना विस्तार यांचे टप्प्याटप्प्याने विश्लेषण केले आणि यावर जोर दिला की, "भाषा विषयांच्या पेपर्समध्ये उच्च गुण मिळवण्यासाठी विचारांची स्पष्टता हीच गुरुकिल्ली आहे.“ या संवादात्मक सत्रादरम्यान, विद्यार्थ्यांनी व्याकरण आणि वेळ व्यवस्थापनासंबंधीच्या अनेक जुन्या शंकांचे निरसन करून घेतले. अलफैज हायस्कूलचे शिक्षक शेख नवाब यांनी शेख शकील यांच्या निःस्वार्थ योगदानाबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

"विद्यार्थ्यांची तयारी आणि परीक्षेच्या अपेक्षा यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी अशा तज्ञांचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे," असे ते म्हणाले. या कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी आगामी सराव परीक्षा आणि बोर्ड परीक्षांमध्ये या धोरणात्मक सूचनांची अंमलबजावणी करण्याचे वचन दिले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002